# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट २८९- २३** **दिनांक :- २९/०८/२०२३.**

## अंमली पदार्थ विक्री करिता आलेल्या ०५ राजस्थानी नागरिकांना ताब्यात घेवुन त्याचेकडुन एकुण २१,००,०००/- रुपये किमतीचा अंमली पदार्थ (एम.डी,) जप्त तुळींज पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण कक्षाची कामगीरी

दिनांक २८.०३८.२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस अंमलदार छपरीबन यांना त्यांचे गुप्त माहीतीदाराकरवी माहीती मिळली कि प्रकाश भाडु नावाचा इसम त्याचे राहते घरी रुम नं. ३०२ दत्त आशिर्वाद इमारत सेंट्रल पार्क या ठिकाणी एम.डी. नावाचे अंमली पदार्थाची विक्री करित असुन, आज रोजी अंमली पदार्थ खरेदी करण्याकिरता त्याचेकडे ४ ते ५ राजस्थानी लोक आलेले आहेत. सदरबाबत त्यांनी लागलीच वपोनि/श्री शैलेंद्र नगरकर यांना माहीती दिली. वपोनि/नगरकर यांनी लागलीच पोनि/ सुधीर चव्हाण यांना छापा कारवाईचे आयोजन करणेबाबत आदेशित केले, सदरबाबत मा.सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत आदेश प्राप्त करुन घेवुन तसेच सोबत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने जावुन पाहणी केली असता, रुम नं. ३०२ दत्त आशिर्वाद इमारत दत्त नगर सेंट्रल पार्क नालासोपारा पुर्व या रुममध्ये असलेल्या ०५ इसमांना, ताब्यात घेवुन त्यांची अंगझडती घेतली असता, खालील वर्णनाचा अंमली पदार्थ मिळुन आला आहे.

१) दिनेशकुमार जावंताराम बिष्णोई वय ३१ वर्षे याचे अंगझडतीत एकुण ५९ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला .
२) सुनिल बिराराम बिष्णोई वय ३० वर्षे अंगझडतीत ५५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला
३) ओमप्रकाश क्रिष्णराम किलेरी वय ३० वर्षे याचे अंगझडतीत ५५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला .
४) लादुराम हरिकिसन बिष्णोई वय ४० वर्षे याचे अंगझडतीत २६ ग्रॅम एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला
५) प्रकाशकुमार पुनमाराम बिष्णोई वय २३ वर्षे याचे अंगझडतीत १५ ग्रॅम वजनाचा एम. डी. अंमली पदार्थ मिळुन आला आहे.

वर नमुद आरोपीत यांचे अंगझडतीत एकुण २१० ग्रॅम वजनाचा २१,००,०००/- रुपये किंमतीचा एम.डी. अंमली पदार्थ व मोबाईल फोन मिळुन आले असुन सदरचा अंमली पदार्थ त्यांचे ओळखीचा पाहिजे आरोपीत प्रकाश बेलाराम भादु. रा. हेमागुडा ता. चितलवाना जि. सांचोर सध्या रा. रुम नं. ३०२ दत्त आशिर्वाद इमारत सेंट्रल पार्क नालासोपारा पुर्व याचेकडुन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच सदरचा अंमली पदार्थ राजस्थान येथे विक्री करित असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. आरोपीत याचेविरुद्ध तुळींज पोलीस ठाणे गु.रजी.नं. ६१७/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २१ क, २९ प्रमाणे दिनांक २८.०८.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री. पौर्णिमा चौगुले-श्रींगी मॅडम पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. सुधीर चव्हाण, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. एम.डी.म्हात्रे, पो.उप.निरी. बि.एस.बांदल, स.फौ. सुतनासे, पो.हवा. आनंद मोरे, ८ उमेश वरठा, केंद्रे, पो.अं. कदम छपरीबन यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.




---000---